


स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ

नांदेड– ४३१६०६ (महाराष्ट्र)

SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY

NANDED-431606, MAHARASHTRA STATE, INDIA.

Established on 17th September 1994 - Recognized by the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with 'A' Grade

# ACADEMIC (1-BOARD OF STUDIES) SECTION

Phone: (02462) 229542
Fax : (02462) 229574

Website: www.srtmun.ac.in

E-mail: bos.srtmun@gmail.com


संदर्भ : शैक्षणिक(१)/सामाजिकशास्त्रे/२०१६–१७/२२०८ दिनांक : ०३.०१.२०१७.

प्रति,

मा. समन्वयक/सदस्य,
सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत
विविध विषयांच्या अभ्यासक्रम समित्या,
(सोबत जोडलेल्या यादीनुसार)

विषय : सामाजिकशास्त्रे विद्याशाखेंतर्गत शैक्षणिक वर्ष २०१७–१८ पासून Choice Based Credit System (C.B.C.S.) पद्धतीप्रमाणे द्वितीय व तृतीय वर्षाच्या पदवी/पदव्युत्तर अभ्यासक्रम तयार करण्याबाबत.

महोदय/महोदया,

आपणास विदितच आहे की, प्रस्तुत विद्यापीठाने शैक्षणिक वर्ष २०१६–१७ पासून Choice Based Credit System (C.B.C.S.) पद्धती लागू केली असून, त्याचे पहिले वर्ष यशस्वीपणे पूर्ण झाले आहे. पदवी अभ्यासक्रमांच्या द्वितीय वर्षासाठी अभ्यासक्रम तयार करण्याची प्रक्रिया सुरू झाली आहे. या करिता मा. कुलगुरू महोदयांनी आपले यादीनिहाय विषयांमाली नामांकन केले आहे.

तरी, उपरोक्त विषयाच्या अभ्यासक्रमासाठी प्रकरणे व घटक प्रस्तावित करताना अभ्यासक्रम हा बदलत्या परिस्थितीशी निगडित, नावीण्यपूर्ण व रोजगारक्षम असावा. तसेच कौशल्यविकास विषयात प्रात्यक्षिकतेवर भर असावा इत्यादी बाबी लक्षात घेऊन आपण पूर्वतयारी करावी.

तरी उपरोक्त विषयाच्या अभ्यासक्रमासाठी मार्गदर्शक सूचनांकरिता दि. ०५/०१/२०१७ रोजी सकाळी ११:०० वाजता विद्यापीठाच्या सिनेट हॉल (अधिसभागृह) येथे बैठकीचे आयोजन केलेले आहे.

तरी बैठकीस उपस्थित राहून अभ्यासक्रम तयार करण्याच्या प्रक्रियेत सहकार्य करावे, ही विनंती.

आपला विश्वासू,

स्वाक्षरित/–
उपकुलसचिव
शैक्षणिक (१–अभ्यासमंडळ) विभाग

सोबत : वरीलप्रमाणे.

टीप : एकाच वाहनाने तीन व्यक्तींनी प्रवास केल्यास वाहन भाडे देय राहील.

प्रत माहिती तथा योग्य त्या कार्यवाहीस्तव: प्राचार्य, सर्व संबंधित महाविद्यालये, प्रस्तुत विद्यापीठ.

P.T.O.